शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर!! विश्वासाची परंपरा!!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी. रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड.
संपर्क : ०२३०३७७, मो. ८४३२७७१७७७
शाखा : माळीवेस, बीड
संपर्क : ०२२०३७७, मो. ९४०५०७२७७७

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १९० ●शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये

मनोज जरांगेंच्या बैठकीला इच्छुकांची गर्दी

आठ हजाराच्या आसपास लोकांची उपस्थिती ; 'पाडायचे की लढायचे' चर्चा

बीडमधून नवले, ज्योतीताई मेटे, मस्के, राजेसाहेब देशमुख, हिंगे, पोकळे, जाधवांची हजेरी

जालना । प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बोलवलेल्या इच्छूक उमेदवारांच्या बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत असून किमान आठ हजारापेक्षा अधिक लोक या बैठकीला उपस्थित असल्याचे पहावयास मिळते. उमेदवार पाडायचे की उभे करायचे ? या प्रश्नाला इतर पक्षांच्या दारात जाऊन आलेले इच्छूक उमेदवार उभे करण्यावर भर देत आहे तर अन्य सर्वसामान्य उमेदवार पाडण्यावर भर देत असल्याचे आजच्या बैठकीवरून दिसून आले. २० तारखेला समाजासोबत होणाऱ्या बैठकीनंतर त्यावर निर्णय घेतला जाणार आहे तर बीड जिल्ह्यातूनही अनेक इच्छूक जरांगे पाटलांच्या भेटीला गेले. त्यामध्ये माजी मंत्री सुरेश नवले, शिवसंग्रामच्या ज्योतीताई मेटे, भाजपाचे राजेंद्र मस्के, पुजा मोरे, काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, रमेश पोकळे, बी.बी. जाधव, माजलगावातून प्रदीप सोळंके, संतोष डावकर, महेश दाभाडे,

▶▶ उर्वरित पान २ वर

मनोज जरांगेंच्या इशाऱ्यानंतर भाजपचा नेता उत्तररात्री पावणेदोनला अंतरवाली सराटीत, गुप्त खलबतं, भाजपकडून मनधरणीच्या हालचाली?

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवा, अशी मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली होती. महाराष्ट्रात निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत महायुतीचा सुपडा साफ करणार, असा इशारा दिला. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार टीका केली. यानंतर महायुतीतील महत्त्वाचे नेते मनोज जरांगे यांची भेट घेण्यासाठी अंतरवाली सराटीत दाखल होत आहे. राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मध्यरात्री मनोज जरांगे यांची अंतरवाली सराटीत भेट घेतली. दोघांमध्ये तब्बल एक तास चर्चा देखील झाली. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्यावर उतरलेले मनोज जरांगे यांनी राज्यात निवडणुका

▶▶ उर्वरित पान २ वर

थोडक्यात

रेल्वे तिकीट रिझर्व्हेशनच्या नियमांमध्ये मोठा बदल, आता ६० दिवस आधी बुकिंग करता येणार

मुंबई । प्रतिनिधी

रेल्वे तिकीट रिझर्व्हेशनच्या नियमांमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार आता ६० दिवस आधी तिकीट रिझर्व्ह करता येणार आहे. पूर्वी हा कालावधी १२० दिवसांचा होता. नवीन नियम १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू होणार आहे. रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबर २०२४ पासून तिकीट रिझर्व्ह करण्यासाठी ६० दिवस आगोदर (प्रवासाचा दिवस सोडून) जागा आरक्षित करावी लागणार आहे. जुना १२० दिवसांचा नियम ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत कायम राहणार आहे. त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्याचबरोबर ६० दिवसांच्या कालवधीत रिझर्व्ह केलेली तिकीट रद्द करण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, परदेशी पर्यटकांच्या नियमामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. म्हणजेच त्यांचा ३६५ दिवसांचा कालावधी कायम असणार आहे.

नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी

बीड । प्रतिनिधी

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे. शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने आचारसंहिता कालावधीत सदरील शस्त्रे जमा करावीत. तसेच आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करण्याची कार्यवाही पोलिस विभागाने करावी. यामध्ये बँक, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र व इतर महत्त्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून सदरील शस्त्रांबाबत कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे.

पुन्हा रेल्वे अपघात, लोकमान्य टर्मिनल एक्स्प्रेसचे ८ डबे रुळावरून घसरले ; आसाममध्ये रेल्वे सेवा विस्कळीत

वृत्तसंस्था

आसामध्ये रेल्वेचा अपघात झाला आहे. आसाममधील दिमा हासाओ जिल्ह्यातील दिबालाँग स्टेशनवर आगरतळा-लोकमान्य टिळक टर्मिनल एक्स्प्रेसचे आठ डबे रुळावरून घसरले. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर जखमी झाल्याचे वृत्त नाही. दुपारी ३.५५ वाजता झालेल्या या अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. अपघातग्रस्त मदत वैद्यकीय ट्रेन अधिकाऱ्यांसह बचावासाठी दाखल झाले आहेत. लुमडिंग-बदरपूर सिंगल लाईन हिल सेक्शनवरील गाड्यांचे संचालन स्थगित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अशी, ही घटना लुमडिंग विभागांतर्गत लुमडिंग-बर्दरपूर हिल विभागात गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास घडली. लुमडिंग-बदरपूर सिंगल लाईन सेक्शनवरील गाड्यांची वाहतूक बंद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. बचाव आणि पुनर्संचयित कार्यांवर लक्ष ठेवण्यासाठी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह लुमडिंग येथून अपघात निवारण ट्रेन आणि अपघात निवारण वैद्यकीय गाडी घटनास्थळी रवाना झाली आहे.

माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव, जनतेचा आशीर्वाद आहे तोवर मी कुणाला घाबरत नाही : धनंजय मुंडे

पुण्यातील विद्यार्थी संवाद मेळाव्यास तुफान प्रतिसाद

कॉलेज व मैत्रीतील आठवणीना मुंडेंनी दिला उजाळा

पुणे । प्रतिनिधी

मी ज्याच्यासोबत आहे त्याच्यासोबत इमानदारी दाखवली म्हणून माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव आखला जातं आहे, माझ्या नशिबात संघर्ष पाचवीला पुजला आहे, त्यामुळे तुमच्या सहकार्याने आणि आशीर्वादाने मी कोणाला घाबरत नाही, तुम्ही साथ द्या, मी तुमच्यासोबत कायम राहील असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पुणे येथे बोलताना केले.

पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विद्यार्थी संवाद मेळाव्यात मुंडे बोलत होते. बीड जिल्ह्यातील आणि परळी मतदार संघातील विद्यार्थ्यांशी यावेळी मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, या मेळाव्याला पंकजाताई मुंडे देखील येणार होत्या, पण त्या दिल्लीत आहेत, त्यांनी माझ्याजवळ शुभेच्छा संदेश दिला आहे. मी पुण्यात शिकलो असं सांगत मुंडे यांनी पुण्याचं अन माझं एक वेगळं नातं आहे असं म्हटलं.

यावेळी कॉलेज जीवनातील आणि मित्रांसोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी मी नेता नसून तुमचा देखील मित्रच आहे, असे समजा म्हणत उपस्थित तरुणांना साद दिली.

माझ्या राजकीय प्रवासात मी अनेक संघर्ष पाहिले. रोज नव्या आव्हानांना तोंड देत मी इथपर्यंत पोहचलो आहे. राजकीय वाटचालीत मला अजितदादा पवार यांनी जी साथ दिली ती कधीही न विसरता येणारी आहे. मी दीड वर्षांपूर्वी त्यांच्यासोबत सत्तेत सहभागी

▶▶ उर्वरित पान २ वर

शहरातील शाळेमधील आहार शिजविण्याचे काम महिला बचतगट, संस्थांना दिले जाणार

शालेय व्यवस्थापन समितीवर सोपवला निर्णय

बीड । प्रतिनिधी

शहरामध्ये शाळेत आहार शिजविण्याचे काम कंत्राट पध्दतीने दिले जात होते. मात्र यामध्ये अनियमितता आल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरील हा निर्णय बदलण्यात आला. आता इथून पुढे शाळा व्यवस्थापन समिती आहार शिजविण्याचे काम बचतगट किंवा संस्थांना देणार आहे. पहिली ते आठवी पर्यंतच्या मुलांना शाळेमध्ये आहार दिला जातो.

केंद्र सरकार पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत राज्यातील पात्र शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पोषणआहार दिला जातो. शहरी भागात धान्य साठवणे, स्वयंपाक गृहासाठी जागा

उपलब्ध नसलेल्या शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली द्वारे आहार पुरविण्यात येतो. २०१९पासून केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दती स्विकारण्यात आली. त्यासाठी शिक्षण विभागाकडून दरवर्षी २०० रूपये खर्च केले जातात. केंद्रीय स्वयंपाक गृहाच्या निवडीसाठी महापालिका, नगर पालिका, नगर परिषद, कटक मंडळ स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून महिला बचत गट स्वयंसेवी संस्था,

▶▶ उर्वरित पान २ वर

बीडच्या तत्कालीन पोलीस अधिकारी भाग्यश्री नवटाकेंच्या विरोधात केला सीबीआयने गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

जळगावमधील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) पतसंस्थेतील गैरव्यवहार प्रकरणात संशयित आरोपी सुनील झंवर, तसेच कुणाल शाह यांनी पोलीस महासंचालकांकडे दिलेल्या तक्रार अर्जावरून पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील तत्कालीन पोलीस उपायुक्त भाग्यश्री नवटाके यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला आहे. त्यानंतर सीबीआयने याप्रकरणी मोठी कारवाई केली

आहे. फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याप्रकरणी सीबीआयने नवटाकेंविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नवटाके यांनी यांनी १,२०० कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीच्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पथकाचं नेतृत्त्व केलं होतं. यात त्यांनी उचित कारवाई केली नसल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. त्यांनी यामध्ये आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप होत आहे. नवटाके यांनी प्रचलित कार्यपद्धतीकडे दुर्लक्ष करून घाईगडबडीने, तसेच कोणता तरी हेतू ठेवून गुन्हे दाखल केले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी दिलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

तुळजाभवानीचे दर्शन घेऊन मुंबईकडे जाताना धनंजय मुंडेंच्या पत्नीचा अपघात

परळी । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे यांच्या कारला पुणे ते सोलापूर मार्गावर गुरुवारी पहाटे अपघात झाला. ट्रॅव्हल बस सोबत कारची धडक झाल्याने अपघातात राजश्री मुंडे किरकोळ जखमी झाल्या आहेत. सुदैवाने या अपघातात राजश्री मुंडे यांना किरकोळ दुखापत झाली असून त्या सुखरूप आहेत.

राजेश्री मुंडे ह्या परळीहून बुधवारी दुपारी कारने निघाल्या. तुळजापूर येथे तुळजाभवानीचे त्यांनी दर्शन घेतले. तेथून त्या

मुंबईकडे निघाल्या. दरम्यान, पुणे ते सोलापूर महामार्गावर सोरतापवाडी या ठिकाणी राजश्री मुंडे यांच्या कार आणि ट्रॅव्हल बसमध्ये जोरदार धडक झाली. यात राजश्री मुंडे यांच्या कारच्या समोरील बाजूचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या अपघातात राजश्री मुंडे यांना किरकोळ दुखापत झाली आहे. त्यानंतर दुसऱ्या कारने त्या मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती आहे.

तिन्ही आरोपीविरुद्ध एलओसी जारी, बाइकवरुन पडले म्हणून रिक्षाचा आधार

मुंबई । प्रतिनिधी

गुन्हे शाखेने बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणातील मास्टरमाइंड मोकाट असून, याप्रकरणातील पसार आरोपी शुभम लोणकर, शिवकुमार गौतम आणि निशान अख्तर देश सोडून पळून जाऊ नये म्हणून लूक आऊट सर्क्युलर जारी केले आहे.

दुसरीकडे बाइकवरून पडले म्हणून शूटर्सनी बाइकवरून न जाता रिक्षाचा आधार घेतला तसेच घटनेनंतर ओळख लपविण्यासाठी दोघांनी शर्टही बदलल्याचे तपासात समोर आले.

गुन्हे शाखेने याप्रकरणात गुरुमेल सिंग, धर्मराज राधे कश्यप, फंडिंग करणारा प्रवीण लोणकर, भंगारवाला हरीश कुमार निसाद यांना अटक केली आहे. मात्र, यामागील मास्टरमाइंडपर्यंत पोहोचण्यास गुन्हे शाखेला अद्याप यश आलेले नाही. शिवकुमारने बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करत हत्या केली. या घटनेनंतर यातील महत्त्वाचा पुरावा तीन दिवसाने घटनेपासून दोनशे मीटर अंतरावर सापडला. त्यामुळे मुंबई पोलिसांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना या बॅगेची भर पडली. या बॅगेत हरीशने सेकंड हँड बाईक खरेदीची पावतीदेखील मिळाली. शूटर्सना बाइकवरूनच घटनास्थळ गाठून हत्येचा कट होता. मात्र, बाईक वरून जाताना पडल्याने त्यांनी तो निर्णय मागे घेत बाईक पुन्हा घराकडे पार्क करून रिक्षाने घटनास्थळ गाठले. शिवकुमार गौतम ऊर्फ शिवा याने टर्किशमेड पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्यांनी जीव घेतल्याचे तपासात समोर आले आहे.

झिशान यांनी घेतला तपासाचा आढावा

झिशान सिद्दीकी यांनी बुधवारी सायंकाळी मुंबई पोलिस आयुक्त कार्यालय गाठून सह पोलिस आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांची भेट घेतली. माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणाचा तपासाचा आढावा घेत त्यांच्याकडील काही माहिती गुन्हे शाखेला दिली आहे. हत्या प्रकरणानंतर तपासात समोर आलेल्या विविध मुद्द्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली. अर्धा ते पाऊण तास लखमी गौतम यांच्या दालनात ही चर्चा सुरू होती. यावेळी अप्पर पोलिस आयुक्त शशी कुमार मीनादेखील हजर होते. झिशान यांनी माध्यमांशी बोलणे टाळले. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर तपासात काय काय समोर आले ? गुन्ह्यांचा तपास कुठंपर्यंत आला ? अशा विविध विषयांची माहिती घेत तपासाचा आढावा घेतला.

महिला-बालविकास मंत्र्यांचं फेसबुक अकाउंट हॅक, आदिती तटकरे यांनी स्वत: दिली माहिती

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचं फेसबुक अकाउंट हॅक झाल्याची माहिती समोर येत आहे.

अज्ञात हॅकर्सने आदिती तटकरे यांचं फेसबुक अकाउंट हॅक केलं आहे. तसेच त्या हॅकर्सकडून आदिती तटकरे यांच्या फेसबुक अकाउंटवरुन काही आक्षेपार्ह पोस्टही करण्यात आल्या आहेत. याबाबतची माहिती स्वत: आदिती तटकरे यांनी ट्विट करत दिली आहे. आदिती तटकरे यांनी संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. आता पोलिसांना हॅकर्सचा शोध घेण्यात यश येतं का ? तसेच पोलीस संबंधित आरोपींवर काय कारवाई करतात ? ते पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.

आदिती तटकरे काय म्हणाल्या ?

नमस्कार, माझं फेसबुक अकाऊंट काही अज्ञात व्यक्तींकडून हॅक करण्यात आले असून त्यावरून काही आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केला जात आहे. अशा पोस्टवर कृपया आपण व्यक्त होऊ नये, ही नम्र विनंती. याबाबत मी पोलिसांत रितसर तक्रार दाखल केली असून लवकरच या हॅकर्सचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. तसदीबद्दल क्षमस्व, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे.

संपादकीय...

शिवसेना विरुद्ध शिवसेना

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी साडेपाच दशकांपूर्वी शिवसेनेची स्थापना केली. मराठी माणसाची एकजूट व्हावी, मराठी माणसाचा आवाज बुलंद व्हावा आणि मुंबई व महाराष्ट्रावर मराठी माणसांचे वर्चस्व असावे या हेतूने त्यांनी शिवसेना स्थापन केली. दरवर्षी होणाऱ्या शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुखांचे होणारे भाषण मराठी माणसांना विचारांची मेजवानी असायची. त्यांच्या भाषणातून मराठी माणसाला नवीन ऊर्जा मिळायची, संघर्षासाठी नवीन दिशा मिळायची. शिवसेनाप्रमुखांचा शब्द म्हणजे लाखो शिवसैनिकांना तो आदेश असायचा. बहुरंगी मुंबईमध्ये मराठी माणसाला ताठ मानने उभे केले ते शिवसेना प्रमुखांनीच. शिवसेनाप्रमुख हे शिवसैनिकांचे दैवत होते, त्यांनी आयुष्यभर स्वत:साठी काही मागितले नाही, कोणत्याही सरकारी पदाचा स्वीकार केला नाही. त्यांनी मनोहर जोशी, नारायण राणे यांना मुख्यमंत्री केले. राज्यात व केंद्रात दोन-तीन डझन शिवसैनिकांना मंत्री केले. चार-पाच डझन शिवसैनिकांना सत्तेच्या परिघात अधिकाराची पदे दिली. राज्याचे मुख्यमंत्री किंवा केंद्रात मंत्री होणे हे त्यांना मुळीच कठीण नव्हते. पण त्यांनी सत्तेच्या खुर्चीला कधी स्पर्शही केला नाही. महाराष्ट्रात मराठी व देशात हिंदू हा त्यांचा मंत्र होता. दरवर्षी विजयादशमीला विचारांचे सोने लुटायला लाखो शिवसैनिक मुंबईत शिवतीर्थावर येत असत. वाजत- गाजत, गुलाल उधळत पण शिस्तीने यायचे यावर त्यांचा कटाक्ष असायचा. शिवसेनाप्रमुखांच्या उपस्थितीत झालेले दसरा मेळावे आता फक्त आठवणी उरल्या आहेत. त्यांची विजेप्रमाणे कडाडणारी भाषणे व राज्यकर्त्यांना दिले जाणारे इशारे सरकारला कापरे भरवत असत. महाराष्ट्र आणि मराठी माणसाचे हित एवढाच त्यांचा अजेंडा होता. शिवसेनेतून अनेक मोठे नेते पक्ष सोडून गेले. राज ठाकरेंपासून गणेश नाईक, छगन भुजबळांपर्यंत अनेक जण बाहेर पडले. कोणी दुसऱ्या पक्षात गेले तर राज यांनी स्वतःचा महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष स्थापन केला. पण शिवसेनाप्रमुखांची शिवसेना कधी संपली नाही. शिवसेना आणि शिवसेना ब असे कधी घडले नव्हते. नारायण राणे भाजपात आहेत, मोदी-शहांनी त्यांना केंद्रीच मंत्रीपद देऊन सन्मान केला. त्यांनीही कोकणात प्रथमच कमळ फुलवून चमत्कार घडवला. ते भाजपाचे खासदार आहेत पण त्यांचे आजही दैवत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेच आहेत. त्यांचे संस्कार आपल्यावर आहेत हे आजही ते अभिमानाने सांगत असतात. महाआघाडी सरकारमध्ये उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री राहिले. एकनाथ शिंदे यांच्याकडे सर्वात मौल्यवान असे नगर विकासखाते होते. पण त्यांना स्वातंत्र्य नव्हते. नगरविकास खाते व महापालिकांचा कारभार ठाकरे पिता- पुत्र व त्यांचा परिवारच बघत होता, अशी उघड चर्चा होत असे. ठाकरेंनी केलेली काँग्रेसशी जवळीक आणि सरकारमध्ये असून अधिकार नाहीत, अशी शिंदे यांची दुहेरी कोंडी होत होती. हिंदुत्वाच्या मुद्दयावर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सेनेच्या आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवला आणि विधिमंडळ पक्षातच मोठी फूट पडली. पक्षाचे चाळीस आणि समर्थक दहा असे पन्नास आमदार, डझनभर खासदार शिंदेंच्या नेतृत्वाखाली उद्धव यांची साथ सोडून भाजपाबरोबर गेले. निवडणूक आयोगानेही आमदार-खासदारांच्या संख्येच्या आधारावर एकनाथ शिंदे यांची शिवसेना खरी ठरवली. पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे पक्षाचे निवडणूक चिन्ह आयोगाने शिंदे यांना बहाल केले. उद्धव ठाकरे यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाने पक्ष चालवायला अनुमती दिली व निवडणूक चिन्ह मशाल देण्यात आले. शिंदे गटाने पक्ष चोरला वडील चोरले म्हणून ठाकरे यांनी क्रोध प्रकट केला. शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला मुख्यमंत्री पदावरून हटविण्याचे धाडस एकनाथ शिंदे यांनी करून दाखवले. त्याची किंमत भाजपाने त्यांना राज्याचे मुख्यमंत्रीपद दिले. शिवसेनेची सत्ता गेली, ठाकरेंचे मुख्यमंत्रीपद गेले. भाजपाच्या आशीर्वादाने पुन्हा शिवसेनेची सत्ता आली व शिंदे मुख्यमंत्री झाले. ठाकरेंची शिवसेना खच्ची करणे, हा भाजपाचा राजकीय अजेंडा होता, तो शिंदे यांच्या बंडाने साध्य झाला. येत्या विधानसभेत शिवसेना विरुद्ध शिवसेना, ठाकरे विरुद्ध शिंदे, मुख्यमंत्री विरुद्ध माजी मुख्यमंत्री, शिवसेनाप्रमुखांचा पुत्र विरुद्ध शिवसैनिकांचा कडवट शिवसैनिक असा इरेला पेटलेला संघर्ष बघायला मिळणार आहे. विधानसभा निवडणूक म्हणजे ठाकरे व शिंदे यांची अग्निपरीक्षा आहे. शिवसैनिक आणि मतदार कोणाच्या पाठीशी आहे याचा कौल या निवडणुकीत बघायला मिळणार आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून व उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यापासून शिवसेना या बॅनरखाली दरवर्षी मुंबईत दोन दसरा मेळावे होत आहेत. शिवतीर्थावर कोणी मेळावा घ्यायचा हा पहिल्या वर्षी वाद जरूर झाला. कोर्टातही प्रकरण गेले होते. ठाकरेंच्या शिवसेनेचा मेळावा शिवतीर्थावर व शिंदेंच्या शिवसेनेचा मेळावा बीकेसीवर झाला. गेल्या वर्षीपासून ठाकरेंचा दसरा मेळावा दादरला शिवतीर्थावर व शिंदेंच्या शिवसेनेचा आझाद मैदानावर होतो आहे. इकडे ठाकरे व तिकडे शिंदे. दोन्हीकडे भगवे झेंडे फडकत असतात. इकडे मशाल, तर तिकडे धनुष्यबाण दिसतो. शिवसेनाप्रमुखांच्या संस्कारातून वाढलेले नेते दोन्ही मेळाव्यांतून मंचावर दिसतात. दोन्हीकडे जय भवानी जय शिवाजी, आवाज कुणाचा, शिवसेनेचा अशा घोषणा ऐकू येतात. दोन्हीकडे रणशिंगे फुंकली जातात. पाऊस चिखल आणि तीच तीच भाषणे यामुळे शिवसैनिकांचा जोश दोन्हीकडे यंदा कमी जाणावला. यंदा विचारांचे सोने कुठे लुटले गेले, या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. सामोपचाराचा मार्ग गांडूंनी सांगावा असे शिवसेनाप्रमुख दसरा मेळाव्याच्या मंचावरून कडाडायचे तेव्हा समोरून शिवसैनिकांच्या शिट्या नि टाळ्यांचा महाप्रचंड कडकडाट व्हायचा. मराठी माणसाच्या एकजुटीसाठी त्यांनी शिवसेना उभारली. आता दोन शिवसेना, दोन पक्षप्रमुख, दोन दसरा मेळावे. आम्हीच खरे, दुसरा खोटा, असे दोन्हीकडून मुठी आवळून, हात उंचावून सांगितले जाते. एकनाथ शिंदेंच्या भाषणाला मुख्यमंत्रीपदाची धार असते. ठाकरेंवर वार करताना ती तीक्ष्ण होते. कोरोना काळात घरात बसलात, लोक मरत होते तेव्हा तुम्ही मढ्यावरचे लोणी खात होता पीएमने उद्घाटन केलेल्या मुंबई मेट्रो-३ ला मुख्यमंत्री असताना विरोध केलात. १७ हजार कोटींचा खर्च वाढला. ते जनतेचे पैसे, वाचले असते तर आम्ही ते महिलांना आणखी दिले असते सत्तेवर असताना घरी बसलात, आता गल्लोगल्ली फिरताय लाडक्या बहिणी तर तुम्हाला निवडणुकीत जोडे मारतील त्यांचे फेक नॅरेटिव्ह आम्ही पॉझिटिव्ह तुम्ही भगव्याचा रंग बदललात, बॉम्बस्फोटातील आरोपी तुमच्या प्रचारात फिरत होता, पाकिस्तानचे झेंडे तुमच्या प्रचारात फडकवले गेले एमआयएम व उबाठा सेनेत आता काही फरक राहिला नाही हा २४ बाय ७ काम करणारा कार्यकर्ता आहे, मला समृद्ध समर्थ विकसित महाराष्ट्र घडवायचा आहे, मी मैदानातून पळून जाणारा नाही, तर पळवून लावणारा बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघेंचा शिवसैनिक आहेहोती दाढी म्हणून उद्धवस्त केली महाआघाडी अशा शब्दांत ठाकरेंच्या दिशेने आझाद मैदानावरून तोफा धडाडल्या. आझाद मैदानावरून आक्रमक व जबरदस्त भाषण झाले ते पक्षाच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांचे. त्यांनी मेळाव्यातील शिवसैनिकांमध्ये ऊर्जा निर्माण केली.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात ३४५ पदे जाणार भरली

नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी एक मोठी सुवर्णसंधी आहे. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेला सुरूवात झालीये. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांनी अजिबातच वेळ वाया न घालता भरतीसाठी अर्ज करावीत. विशेष म्हणजे केंद्र शासनाची नोकरी करण्याची ही संधी तुमच्याकडे आहे.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात ३४५ पदांसाठी भरती सुरू आहे. या भरती प्रक्रियेची विविध पदे ही भरली जाणार आहेत. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांनी फटाफट भरतीसाठी अर्ज करावीत. चला तर मग जाणून घ्या या भरती प्रक्रियेबद्दल अधिक आणि अर्ज करण्याची अगदी सोपी प्रक्रिया.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाकडून ही भरती राबवली जातंय. या मेगा भरतीची अधिसूचना देखील प्रसिद्ध करण्यात आलीये. १६ ऑक्टोबरपासून या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया ही सुरू झालीये. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही १४ नोव्हेंबर २०२४ आहे. इच्छुक उमेदवारांना त्यापूर्वीच भरतीसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत. या भरती प्रक्रियेसाठी वयाची आणि शिक्षणाची अट ही लागू करण्यात आलीये. सुपर स्पेशालिस्ट मेडिकल ऑफिसर, स्पेशालिस्ट मेडिकल ऑफिसर आणि मेडिकल ऑफिसरसह विविध पदांचा समावेश आहे. नोकरीच्या शोधात असलेले उमेदवार हे या भरती प्रक्रियेसाठी आरामात अर्ज करू शकतात. २१ ते ३५ वयोगटापर्यंतचे उमेदवार हे या भरती प्रक्रियेसाठी आरामात अर्ज करू शकतात. या भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना ४०० रूपये फीस ही भरावी लागेल. प्रवर्गातील उमेदवार आणि महिला यांना फीस भरण्याचे टेन्शन नसणार आहे. recruitment.itbpolice.nic.in या साईटवर जाऊन आपल्याला भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत.

अजूनही मतदार नोंदणी केलीच नाही? मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी 'या' तारखेपर्यंत शेवटची संधी!

विधानसभा निवडणुकीमध्ये संबंधित जिल्ह्यातील नागरीकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदार यादीत आपले नाव असणे आवश्यक आहे. या निवडणूकीत वापरल्या जाणाऱ्या मतदार यादीत नाव येण्यासाठी नमुना अर्ज क्र. ६ च्या अर्जाव्दारे नोंदणी करण्याचा शेवटची तारीख १९ ऑक्टोबर २०२४ हा आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरीकांनी 'मतदाता सेवा पोर्टल' https://voters.eci.gov.in/ आणि 'वोटर हेल्पलाइन ॲप' (Voter Helpline APP) यावर ऑनलाइन सुविधाचा वापर करुन १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्याकरीता नमुना क्र. ६ च्या अर्जाव्दारे नोंदणी करावी, असे आवाहन कोल्हापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे.

मतदान यादीत आपले नाव तपासण्याची प्रक्रिया सोपी आहे. काही मिनिटांमध्ये ऑनलाइन प्रकियेद्वारे मतदान यादीत नाव शोधता येते. सर्वात पहिल्यांदा शश्रशलीींरश्रीशरीलह.शलळ.र्सीं.ळप ला भेट द्यावी लागेल. या लिंकवर जाताच तुम्हाला एका पेजवर तुमचे नाव, वडिलांचे नाव, पतीचे नाव, जन्मतारीख, वर्ष, लिंग, राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ यांच्या माहितीची नोंद करावी लागेल. ही सर्व माहिती भरल्यानंतर 'कॅप्चा' कोड टाकावा लागेल आणि मग संबंधित यादी उघडेल. तसेच electoralsearch.eci.gov.in वर EPIC किंवा मतदार आयडी क्रमांकाद्वारे यादीतील तुमचे नाव तपासू शकता. EPIC क्रमांक आणि राज्य निवडून, तुमचे नाव मतदार यादीत आहे की नाही हे तुम्हाला कळेल. मतदार यादीतील नाव शोधण्याचे दोन्ही पर्याय तुम्ही electoralsearch.eci.gov.in ला भेट दिल्यानंतर दिसून येतील.

पान ४ वरून पुढे.....

निवडणूक शांततेत पार...

मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

यावरही असतील निर्बंध

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इ. करण्यावर तसेच जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध असतील.

प्रचार वाहनांवरील झेंडा, कापडी फलक

प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. वाहनावर लावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

ध्वनीक्षेपकाचा वापर

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधित घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

रहदारीस अडथळा नको

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस्, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

खासगी व्यक्तीच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध

निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीच्या संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत, असेही नमूद आहे.

जागतिक अंध दिनाचे औचित्य ...

यांच्या हस्ते देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास पाठक, जयप्रकाश भुतडा, राजू चोखडा, ईश्वर भुतडा सोमवंशी महाराज यांचे सहकार्य लाभले. व्यासपीठावर संस्थेचे सचिव संदीप चोपडे, सह सचिव मीरा चोपडे आणि सहसचिव प्रशांत गवंडगावे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी बीड ,लातूर, धाराशिव ,नांदेड, जालना ,छत्रपती संभाजीनगर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातून १५० दिव्यांग व्यक्ती सहभागी झाले होते. सकाळी पांढरी काठी जनजागृती फेरी अंबाजोगाई शहरातून काढण्यात आली. या फेरीमध्ये शंभरहून अधिक अंध व्यक्ती सहभागी झाले होते. कार्यक्रमाच प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. माधव गोरे यांनी केले, तर आभार सचिव प्रशांत गवंडगावे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.

मराठा समाजाच्या आजच्या...

फडणवीस मराठ्यांच्या काळजावर वार करून गेले. त्यांना मराठ्यांशी घेणंदेणं नाही, ओबीसीशी घेणंदेणं आहे. हे सांगून गेले. ओबीसीच्या जातीत काही, जाती टाकून अनेक ओबीसी जातींचं आरक्षण कमी केलं.

पालक आणि पाल्य यांना...

तर विद्यार्थी पालकाशी व शिक्षकाशी बोलका होईल, त्याच बरोबर पाल्याला परिस्थितीची जाणीव करून देऊन त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे ध्येर्य निर्माण करावे तसेच मुलांना नकार पचवायची सवय लावावी .., पोक्सो चा कायदा अस्तिवात याच बालकांच्या संरक्षणासाठी आहे त्यामुळे झालाच अन्याय तर शांत न बसता न्यायासाठी दाद मागावी त्यांच्या साठी कायदा व सुव्यवस्था सज्ज आहे या संदर्भात ड संगीता धसे यांनी माहिती दिली, यावेळी अध्यक्षा डॉ सीमा जोशी यांनी मुलांच्या आरोग्या संदर्भात मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुळवेलकर मॅडम व सरांनी केले , यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते रोहिणीताई खाटणकर, राजवनताई, पुराणिकताई उपस्थित होत्या.

बीडमध्ये दोनच आमदारांची...

सोनवणे यांचे होमपिच असलेल्या केजमध्ये पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या पृथवीराज साठे यांच्यासह आता डॉ. अंजली घाडगे, संगीता ठोंबरे, रमेश गालफाडे अशी नावे वाढत आहेत. महायुतीत राष्ट्रवादीचे बाळासाहेब आजबे आमदार असले तरी ही जागा भाजच्या सुरेश धस यांच्यासाठी सोडण्याच्या हालचाली आहेत. उमेदवारी कोणालाही भेटली तरी आजबे, धसांसह माजी आमदार भीमराव धोंडे रिंगणात असतीलच. त्यामुळे महायुतीत बंडखोरी निश्चित आहे. राष्ट्रवादीकडून युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांचे नाव आघाडीवर आहे. यासह नरसिंग जाधव, सतीश शिंदे, राम खाडेही इच्छुक आहेत.

संदीप क्षीरसागरांना स्वकीयांनी घेरले- गेवराईचे आमदार लक्ष्मण पवारांनी भाजप सोडल्यात जमा आहे. त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून प्रयत्न असले तरी शिवसेनेचे (यूबीटी) माजी मंत्री बदाम राव पंडित यांच्या तयारीचा त्यांना अडसर आहे. महायुतीतली भाजपची जागा राष्ट्रवादी (अजित पवार गट) सोडून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह पंडित यांना उमेदवारी निश्चित मानली जाते.दोनदा पक्षफुटीनंतर शरद पवारांशी एकनिष्ठ राहीलेल्या संदीप क्षीरसागर यांना उमेदवारीत स्वकियांनीच गतीरोधक टाकते आहेत. त्यांचे चुलते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याबाबतही चर्चा होत आहे. शिवसेनेकडून अनिल जगताप तर शिवसंग्रामच्या डॉ. ज्योती मेटे देखील येथून तयारी करत आहेत. पक्षाकडे जागा नसती तरी डॉ. योगेश क्षीरसागर, फारुक पटेल, शेख तय्यब देखीत राष्ट्रवादीकडून प्रयत्नशिल आहेत. एमआयएमचे शेख शफिक यांचीही पायाभरणी सुरु आहे.

पोखरा मधून भ्रष्टाचाराबाबत...

तुम्हाला चौकशी अहवाल देण्यात येईल त्यानुसार प्रकल्प संचालक साळवे यांनी जी. एस. वाघ यांची चौकशी समितीच्या अध्यक्षपदी निवड करून एम .आय. शेख यांची सदस्य पदी नेमणूक करून सदरील नेकनूर येथील दीपांकुर ऍग्रो प्रोडूसर कंपनी अंतर्गत करण्यात आलेला भ्रष्टाचारा संबंधित चौकशी करण्याचे आदेश दिले संबंधित जी. एस .वाघ व जिल्हा प्रकल्प संचालक एस .एम साळवे चौकशी अहवाल देण्यास देण्यास टाळाटाळ करत असून त्यांचाही या भ्रष्टाचाराची काही संबंध आहे काय असा आरोप तक्रारदार रामनाथ घोडके यांनी केला आहे. प्रकल्प संचालक एस .एम . साळवे यांनी तक्रारदारास चौकशी अहवाल न दिल्यास विधानसभेच्या मतदाना दिवशी जिल्हाधिकार्यालया समोर आत्मदहन करणार असल्याचा इशाराही निवेदनाद्वारे देणार देणार आहेत.

पान १ वरून पुढे.....

मनोज जरांगेंच्या....

गंगाधर काळकुटे, किशोर पिंगळे, ऋषीकेश बेदरे, महेश बेदरे, यांच्यासह अन्य इच्छूक असल्याचे सांगण्यात येते. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीची घोषणा होताच इच्छुकांसोबत समाजासोबत घेतल्या जाणाऱ्या बैठकांच्या तारखा घोषीत केल्या आणि या बैठकांमधून उमेदवार पाडायचे की उभे करायचे? यावर निर्णय होणार आहे. इच्छुकांची बैठक होत असून या बैठकीला आठ हजारापेक्षा अधिक लोक उपस्थित असल्याचे सांगण्यात येते. अनेक जण उमेदवार उभा करण्याबाबत सांगत आले आहेत. मात्र यामध्ये ज्यांना इतर पक्षांच्या दारामध्ये उमेदवारी मिळालेली नाही असे लोक उमेदवार देण्याबाबत आग्रही असल्याचे सांगण्यात येते. बैठक अद्याप सुरु असून जरांगे पाटील इच्छुकांचे म्हणणे ऐकून घेत आहे तर समाजासोबतची बैठक ही २० तारखेला होणार असून या बैठकीनंतरच उमेदवार उभे करायचे की पाडायचे? यावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

मनोज जरांगेंच्या...

जाहीर होताच आपला संताप व्यक्त केला. आता या निवडणुकीमध्ये निर्णायक मतदान हे मराठ्यांचे आहे. आता रणशिंग फुंकले आहे. लढाईला उतरायचं म्हणजे तलवार काढावी लागेल. सरकारने मराठा आरक्षणाबाबत सरकारने आमची आशा संपवली असल्याचे त्यांनी म्हटले होते. विखे पाटील-मनोज जरांगेंमध्ये तासभर चर्चा यानंतर काल मध्यरात्री भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची अंतरावली सराटीत भेट घेतली. दोघांमध्ये अंतरवाली सराटीत तासभर चर्चा झाली. विशेष म्हणजे राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची आठ दिवसात दुसऱ्यांदा भेट घेतली. मध्यरात्री पावणे दोन वाजता विखे पाटील यांनी मनोज जरांगेंची भेट घेतली. या दोघांमध्ये एक तास चर्चा झाली. विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर मनोज जरांगेंनी महायुतीवर तोफ डागली. यामुळे महायुतीकडून मनोज जरांगेंचा मनधरणीचा प्रयत्न सुरु आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

माझं राजकीय अस्तित्व...

होण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून काही लोक मला संपवण्याची भाषा करू लागले आहेत.माझ्यावर खालच्या पातळीला जाऊन आरोप केले जातं आहेत, माझी जात, माझ्या कुटुंबाचे नाव अगदी माझी लायकी काढली जात आहे. एवढ्या मोठ्या माणसांनी असं बोलण योग्य नाही. पण मी कोणाला भीत नाही, घाबरत नाही. कारण तुमचा अन परळीकरांचा आशीर्वाद सोबत आहे.पुढच्या काळात बीड जिल्ह्याला विचारात घेतल्याशिवाय राज्याचं राजकारण पूर्ण होणार नाही. स्व. मुंडे साहेबांनी जिल्ह्याचे नाव देशात केलं, त्यांच्याच आशीर्वादाने मी माझ्या पद्धतीने जिल्ह्याचे नाव मोठं करण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही सोबत रहा अन आशीर्वाद द्या असं म्हणत मुंडे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी बालगंधर्व रंगमंदिर तरुणाईने हाऊसफुल्ल झालेले पाहायला मिळाले.व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, समीर चांदेरे, अजय मुंडे, महादेव डोईफोडे, राजपाल लोमटे, विठ्ठल सानप, अविनाश नाईकवाडे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरातील शाळेमधील ...

अशासकीय संस्थांची निवड केली जात होती. मात्र या निविदा प्रक्रियेत अनियमितता होत असल्याने आहाराचा दर्जा विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे पुरक आहार न देणे अशा तक्रारी शिक्षण विभागाकडे दाखल झाल्या होत्या. तसेच नियुक्त केलेले महिला बचत गट, संस्थांची मुदत संपुष्टात येवूनही शासन धोरणा विरूध्द महापालिका नगर पालिका स्तरावरपरस्पर मुदतवाढ दिल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने नियमात बदल करण्याचा निर्णय घेतला. शहरातील आहार शिजविण्याची जबाबदारी शालेय व्यवस्थापन समिती, बचत गट किंवा संस्थांना देवू शकतात असा निर्णय घेण्यात आला आहे.

बीडच्या तत्कालीन पोलीस ...

फिर्यादीनुसार, पोलीस उपायुक्त नवटाके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. याबाबतच्या प्रस्तावास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर बंडगार्डन पोलीस ठाण्यात दाखल असलेला गुन्हा सीबीआयकडे तपासासाठी सोपवण्यात आला असून आता सीबीआयने नवटाके यांच्याविरोधात पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

महत्वाचे

राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापक भरतीसाठी स्वतंत्र आयोग येणार?

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांची भरती प्रक्रिया स्थानिक पातळीवर करण्यात येते. मात्र, कुलपती विद्यापीठस्तरीय प्राध्यापक भरतीसाठी स्वतंत्र बोर्ड किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरती करण्यासाठी आग्रही आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने अकृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंना पत्र पाठवून अभिप्राय मागविल्याची माहिती समोर आली आहे. राज्य शासनाने अकृषी विद्यापीठातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार काही विद्यापीठांमध्ये प्राध्यापक भरतीसाठी अर्जही मागविले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातही ७२ जागांच्या भरतीसाठी अर्ज मागविले होते. मात्र, सत्ताधारी पक्षाशी संबंधित संघटनांनी कुलगुरूंचा कार्यकाळ कमी असल्याचे कारण दाखवून प्राध्यापक भरती थांबविण्याची मागणी केली होती. त्यामुळे विद्यापीठातील प्राध्यापक भरती रखडलेली आहे. विद्यापीठास नव्या आरक्षण प्रणालीनुसार प्राध्यापक भरतीसाठी अद्याप मंजुरी मिळाली नाही. त्याचवेळी राज्यातील नागपूर, गडचिरोली येथील विद्यापीठांमध्ये झालेल्या प्राध्यापकांच्या भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहाराचे आरोप झाले होते. या संपूर्ण पार्श्वभूमीवर विद्यापीठांच्या कुलपतीपदी सी. पी. राधाकृष्णन यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यापीठातील प्राध्यापक भरतीमध्ये सुसूत्रता आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दक्षिणेतील अनेक राज्यांमध्ये विद्यापीठातील प्राध्यापक भरतीसाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना केलेली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील विद्यापीठांमधील प्राध्यापक भरतीसाठी एक स्वतंत्र आयोग असावा, त्यादृष्टीने चाचपणी करण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसारच राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र पाठवून स्वतंत्र आयोग किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विद्यापीठांमधील प्राध्यापकांची भरती करण्याविषयी मत मागविले आहे. कुलगुरूंनी प्राध्यापक भरतीविषयी स्पष्ट मत दिल्यानंतर त्याविषयी अधिकृतपणे निर्णय होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

पुढील २ दिवसात या पाच जिल्ह्यांना पावसाचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

ऑक्टोबर महिना सुरू झाला असला तरी देखील पावसाचं सावट कायम आहे. ऑक्टोबर महिन्यात परतीचा पाऊस सुरु आहे. पण या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. काही ठिकाणी तापमानात चढ उतार होताना दिसत आहे. मुंबईमध्ये उष्णतेने लोकं हैराण झाले आहेत. कधी उष्णता तर कधी पाऊस असं चित्र आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार १७ ऑक्टोबरला पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली होती. कोकणात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला होता. कोकणाम ध्ये भात कापणीला आलेला असताना पावसाचा अंदाज असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यात पुढचे दोन दिवस पावसाची शक्यता वर्तवली आहे. हवामान विभागाने पावसाचा अलर्ट दिला आहे. पाच जिल्ह्यांमध्ये जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. जालना, परभणी, हिंगोलीत देखील काही प्रमाणात पाऊस होत आहे. पण रविवारपर्यंत तो वाढण्याची शक्यता आहे. १८ आणि १९ ऑक्टोबर रोजी हवाम ान विभागाने हा पावसाचा इशारा दिला आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात चांगला पाऊस झाला. आता परतीचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

लोकसभेनंतर विधानसभेतही औरंगाबाद नाव कायम

तिन्ही मतदारसंघात जुन्या नावानेच भोंगे वाजणार

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. मात्र मराठवाड्यात एक विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारने दोन शहरांचे नाव बदलले आहे.

मात्र निवडणूक आयोगाच्या दप्तरी या दोन्ही शहरांची आणि त्या अंतर्गत असणाऱ्या विधानसभा मतदारसंघांची नावे जुन्याच नावाने आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनासोबतच उमेदवारांना नवे नाव वापरावे की जुने नाव वापरावे असा पेच निर्माण झाला आहे. यासंबंधी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निवडणूक आयोगाने औरंगाबाद आणि उस्म ानाबाद हेच नाव कायम ठेवण्याचे

आदेश दिल्याचे सांगितले आहे. त्यामुळे उमेदवारांनाही याच नावाने प्रचार करावा लागणार आहे. मराठवाड्यातील दोन जिल्ह्यांचे नाव बदलण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला होता. औरंगाबादचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर, तर उस्म ानाबादचे धाराशिव करण्यात आले. मात्र निवडणूक आयोगाने या दोन्ही जिल्हांचे आणि येथील मतदारसंघांचे नाव औरंगाबाद आणि उस्मानाबाद असेच कायम ठेवले आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. औरंगाबाद पूर्व, औरंगाबाद मध्य आणि औरंगाबाद पश्चिम या तिन्ही मतदारसंघाना शहराचे जुनेच नाव निवडणूक आयोगाने कायम ठेवले आहे. महाराष्ट्रातील महायुती सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही शहरांचे नामांतर केले. केंद्र सरकारने राज्य सरकारच्या प्रस्तावाला मंजूरी देत अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव हा बदल मान्य केला. यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत या दोन्ही मतदारसंघांचे जुनेच नाव कायम राहील असे आदेश दिले होते. तसा उल्लेख लोकभेत झाला. औरंगाबाद लोकसभा आणि उस्मानाबाद लोकसभा असाच उल्लेख शासकीय पातळीवर झाला. उमेदवारांना प्रचारातही हेच नाव वापरावे लागले होते. आता विधानसभा निवडणुकींची घोषणा झाली. यात देखील निवडणूक आयोगाने औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर नाव झाले असले तरी शहरातील तिन्ही मतदारसंघांना जुनेच नाव वापरणार असल्याचे म्हटले आहे. औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही मतदारसंघांची पुनर्रचना होत नाही तोपर्यंत हेच नाव कायम राहील असेही आयोगाने म्हटले आहे. त्यामुळे या दोन्ही शहरातील उमेदवारांना जुन्याच नावाने भोंगे वाजवावे लागणार आहे. जुन्याच नावाने प्रचार करावा लागणार आहे.

हिंगोलीतील कळमनुरी तालुक्यातील दांडेगाव परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के

हिंगोली । प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील दांडेगाव व परिसरामध्ये गुरुवारी भूकंपाचे दोन सौम्य धक्के बसले. असे असले तरी त्याची कुठलीही नोंद अद्याप झाली नाही, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयातून देण्यात आली. कळमनुरी तालुक्यातील दांडेगाव आणि परिसरामध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवणे हे दोन-चार वर्षांपासून सुरूच आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अशा परिस्थितीत भूवैज्ञानिकांनी या भागात पाहणी करून भूकंपाचे केंद्र नेमके कुठे आहे, याचा शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. १७ ऑक्टोबर रोजी दांडेगाव येथे दुपारी २:१० मिनिटाला व त्यानंतर लगेच २:१९ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या भूकंपाची रिश्टर स्केल नोंद मात्र अद्याप समजू शकली नाही. याअगोदर १० जुलै रोजी ४.५ रिश्टर स्केल एवढा तीव्र भूकंपाचा धक्का दांडेगाव परिसरात जाणवला होता.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विषयाचा राष्ट्रीय वेबिनार संपन्न

किल्लेधारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आयक्यूएसी आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने न इंटरप्रिटेशन ऑफ द फिलॉसॉफी ऑफ सोशियल जस्टीस अँड पॉलिसी ऑफ रिझर्वे शन इन इंडिया कॉन्स्टिट्यूशन या विषयावरील राष्ट्रीय वेबिनाराचे उद्घाटन डॉ. अरविंद कुमार यांनी केले. आरक्षण हे विस्थापित सम ाजाला अथवा मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या समाजाला प्रस्थापित व्यवस्थेत येण्यासाठी दिलेली सोय आहे. आज आरक्षणाविषयी प्रत्येकाच्या मनामध्ये आस्था निर्माण झालेली दिसून येते. या संबंधी विविध मतप्रवाह ही पहावयास मिळतात. समाजाची प्रगती होण्यासाठी सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून सर्वांनी जीवन जगले पाहिजे असे नमूद केले. या विषयावर मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती डॉ. आफरीन खान संवाद साधताना म्हणाले की, आरक्षणाविषयी स्थापन केलेली विविध आयोग आणि त्यावरील सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. साधन व्यक्ती डॉ. रमेश शेवाळे यांनी सामाजिक न्याय संकल्पना सविस्तरपणे सांगून सामाजिक न्यायाची तत्वे स्पष्ट केली. सामाजिक न्याय हा जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. यामुळे भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सर्व जाती धर्माचे लोक सामाजिक जीवन एकात्मतेच्या भूमिकेतून जगताना दिसतात. या वेबिनारचा

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी वेबिनारच्या माध्यमातून राज्यशास्त्रातील संशोधनासाठी असलेल्या वेग-वेगळ्या अभ्यास क्षेत्रातील संधींची उपस्थिती सर्वांना माहिती मिळाली. माननीय उद्घाटक डॉ. अरविंद कुमार यांचा परिचय श्री. विनायक कापावार यांनी, बीजभाषक डॉ. शेख आफरीन यांचा परिचय डॉ. प्रशांत सोळंके यांनी तर डॉ. रमेश शेवाळे यांचा परिचय राज्यशास्त्र विभागप्रमुख श्री. नागोराव वाघमारे यांनी करून दिला. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. म हादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी सम न्वयक डॉ. एल. बी. जाधवर तसेच या राष्ट्रीय वेबिनारसाठी ऑनलाईन झूम पद्वारे राज्यशास्त्र विषयाचे अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ऑनलाइन झूम पद्वारे आयोजित कार्यक्रमाकरिता तांत्रिक सहाय्य डॉ. विजयकुमार कुंभारे व डॉ. अनंता गाडे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल श्री. गोपाळ सगर यांनी तर आभार श्री. नागोराव वाघमारे यांनी मानले.

गेवराई तालुक्यातील संजय गांधी, श्रावणबाळ निवड याद्यात गदारोळ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

योग्य लाभार्थांची निवड न केल्यास त्वरिता गाव तलावात जल समाधी घेणार: शेख खिजर, जयदेव शिंगणे

तलवाड़ा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राजकिय पटलावर सातत्याने राजकीय कुरखोड्याचे राजकारण होत आसल्याचे जाणकार सांगतात. परंतु सर्व सामान्यांना मिळणा-या विविध शासकीय योजनेचे श्रेय घेण्या संदर्भात देखील प्रशासना कडे विरोध दर्शवून मंजुर झालेल्या योजना देखील काही सत्ता पिपासु बंद पाळण्याच्या पातक कृत्य अंगीकारत असल्याची पण चर्चा होतांना ऐकावयास मिळते. गत काही वर्षा पूर्वी मोठ्या प्रमाणात श्रावणबाळ, संजयगाधी निराधार योजनेचे मंजुरी पत्र वाटप करण्यात आले होते. त्यात त्या वेळी ज्यांनी खुळ घातली होती आता त्यांनीच मोठ्या प्रमाणात नवतरुणाईला व फळ बागायत दारांना प्राधान्य देत श्रावणबाळ, संजयगाधी योजनाच्या याद्या जाहिर केल्या. या मुळे ख-या लाभार्थांकडुन नाराजगी जाहीर केल्या जात असुन नाराज घटकाची दखल घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर यांनी गेवराई तहसिल कार्यालय येथे निवेदन देऊन ख-या लाभार्थींना न्याय मिळण्या संदर्भात मागणी केली होती. तहसील प्रशासनाने या कडे दुर्लक्ष केल्याने दिनांक १५/१०/२०२४ रोजी बीड जिल्हाधिका-यांना या बाबतीत

पुन्हा निवेदन दिले असुन त्यामध्ये म्हटले आहे की शासकीय संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या यादीत योग्य लाभार्थ्याचे व वयोवृध्द, विधवा यांचे नाव न आल्याने मौजे तलवाडा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने दि.२१/१०/२०२४ सोमवार रोजी तलवाडा येथील त्वरिता साठवण तलाव मध्ये जलसमाधी घेण्यात येईल आम्ही दि.११/१०/२०२४ रोजी मा. तहसिलदार साहेब गेवराई यांना निवेदन दिले होते. तरी या विषयावर काहीच निर्णय झालेला नाही. योग्य लाभार्थ्याची अधिकाऱ्या मार्फत अर्जाची छाननी करण्यात यावी व पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. नसता त्याकरीता आम्ही जलसमाधीचा निर्णय घेतला आहे. तरी मा. जिल्हाधिकारी साहेब आपण या विषयाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे, अशी विनंती स्वाभिम ानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन,व जयदेव शिंगने यांनी निवेदनाच्या शेवटी केली आहे.

इम्तियाज जलील यांची मोठी घोषणा; लोकसभा आणि विधानसभाही लढणार, मतदारसंघही ठरला

नांदेड । प्रतिनिधी

एमआयएमचे नेते इम्तियाज जलील नांदेडमधून लोकसभा पोट निवडणूक लढवणार आहेत. तर छत्रपती संभाजीनगरमधून विधानसभा निवडणूक लढणार आहेत. इम्तियाज जलील यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना याबाबतची घोषणा केली आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, नांदेडमधून लोकसभा लढण्याची संधी आलेली आहे. लोकांम ध्ये रोष पाहायला मिळतोय.

मी महाराष्ट्रातील एकमेव म ुस्लिम खासदार होतो. त्याला पाडण्यासाठी महाराष्ट्रातील लोकांनी कशी मेहनत घेतली होती, हे सर्वांना माहिती आहे. आमचे कार्यकर्ते आणि पक्षाचे पदाधिकारी आहेत, त्यांची निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. एमआयएम हा पक्ष म हाराष्ट्रात आल्यानंतर सर्वात जास्त प्रतिसाद आम्हाला नांदेडमध्ये मिळाला होता. जलील म्हणाले, आमच्यावर काही आरोप झाले तरी आम्ही घाबरत नाहीत. आम्हाला बी टीम म्हणतात, आम्ही हे आरोप गेल्या अनेक वर्षांपासून पाहत आहोत. आता आम्ही या आरोपांना काडीचंही महत्त्व देत नाहीत. आम्हाला संधी आल्यानंतर आम्ही दिवंगत खासदाराबाबत का विचार करु? आम्ही आमच्या पक्षाबाबत विचार करणार आहोत. आम्ही कसं निवडून येऊ शकतो, हा विचार करणार आहोत.

नांदेड लोकसभेत काँग्रेस विरूद्ध भाजप अशी लढत झाली होती. यामध्ये काँग्रेस नेते वसंतराव चव्हाण यांनी भाजप उमेदवार प्रतापराव चिखलीकर यांचा पराभव करत विजय मिळवला होता.

माजलगाव महिला व बालविकास विभागाचा लाचखोर अधिकारी संतोष डोंगरदिवे निलंबित

अनाथ विधवा महिला कडून घेत होता लाच ; सामाजिक कार्यकर्ते कपिल आडागळे यांनी पुणे आयुक्त कडे केली होती तक्रार; प्रहार जनशक्ती यांच्या पाठिंब्यामुळे झाला निलंबीत

टाकरवण । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील महिला व बाल विकास अधिकारी श्री. संतोष अंकुष डोंगरदिवे संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) हे उपरोक्त कार्यालयात कार्यरत असताना त्यांच्याकडे बालसंगोपन योजनेचा लाभ मिळाणेकरीता अर्ज स्विकारण्याचे काम असल्याने, तसेच सदर योजनेचा लाभ देण्यासाठी त्यांनी तीन फॉर्मचे सहा हजार रुपये ची मागणी केली तर. अनेक लोकांकडून पैसे घेतल्याशिवाय काम न केल्या ने त्यांची तक्रार अर्जाद्वारे ग्रामपंचायत सदस्य कपिल आडागळे यांनी पुणे आयुक्त कडे तक्रार पुराव्या सहित सादर केली. प्रहार जनशक्ती पक्ष माजलगाव तालुका अध्यक्ष गोपाळ पैंजणे व टाकरवन सर्कल प्रमुख लक्ष्मण गरड यांच्या प्रबळ पाठिंब्यामुळे वरिस्ट अधिकार्याच्या निदर्शनासआल्याने, त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे योजिले आहे. वाचा क्र. २, ३, ४ व ५ अन्वये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड, विभागीय उपआयुक्त, छ. संभाजीनगर व म हिला व बाल विकास आयुक्तालय (बाल विकास शाखा) पुणे यांनी पुढील प्रशासकीय कार्यवाही करणेकरीता कळविले आहे तरी श्री. डोंगरदिवे यांनी कर्तव्यात कसूर केला असल्याचे निदर्शनास आल्याने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे हे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चा नियम ४ चा पोटनियम (१) (अ) मधील तरतुदीनुसार याद्वारे श्री. संतोष अंकुष डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड ता.म ाजलगांव यांना सदर आदेशाच्या दिनांकापासुन शासकीय सेवेतुन निलंबित करण्यात आले असुन् त्यना पुढील आदेश निघेपरेन्त जाईपर्यंत ते निलंबित राहतील.

आदेश देण्यात आले आहे की, हा आदेश अंमलात असेल तेवढया कालावधीत श्री. संतोष अंकुष डॉगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (ता.माजलगाव) यांचे मुख्यालय विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे राहील, त्यांना आयुक्तालयाचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. ४) श्री. संतोष अंकुष डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी कनिष्ठ, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड ता.माजलगाव यांना त्यांच्या निलंबनाच्या कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन व अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन व बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८(१) (ए) नुसार अनुज्ञेय असणारा निर्वाहभत्ता मिळण्यास ते पात्र ठरतील.

५) महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूकनियम १९७९ मधील नियम १६ च्या तरतूदीनुसार त्यांना निलंबन कालावधीत खाजगी नोकरी स्वीकारणे वा धंदा करणे अनुज्ञेय राहणार नाही, निलंबित असताना खाजगी नोकरी स्वीकारल्यास किंवा धंदा केल्यास ते गैरवर्तणूकीबद्दल दोषी ठरतील आणि कारवाईस पात्र ठरतील तसेच अशा बाबतीत ते निर्वाद भत्यावरील आपला हक्क गमायतील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे की, सदर आदेशाची एक प्रत श्री. संतोष अंकुष डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा म हिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (तालुका माजलगांव) यांना बजावण्यात यावी व त्यांची दिनांकीत असलेली स्वाक्षरीत पोहोच आयुक्तालयास सादर करण्यात याबो. तसेच श्री. डोंगरदिवे यांच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्रारुप दोषारोप जोडपत्र १ ते ४ व जोडपत्र ४ मधील सहपत्रांच्या प्रती विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, छ. संभाजीनगर यांच्या मार्फत आयुक्तालयास तात्काळ सादर करण्यात यावे.

जाहीर प्रगटन

मा. श्री. अक्षय सं. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नं. २५० / २०२४

शहाबाई प्रभाकर कंठाळे वि. निरंक

अँड. कोठुळे एच. एस.यांच्या मार्फत

अर्जदार : १. शहाबाई प्र. प्रभाकर कंठाळे, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. दहिफळेवस्ती, मानुर, ता. शिरुर कासार, जि.बीड,

२. रविंद्र पि. प्रभाकर कंठाळे, वय ३१ वर्षे, धंदा - खा. नौकरी व शेती, रा. सदर.

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत..

ज्यापोक्षा **प्रभाकर पि. गंगाधर कंठाळे हे जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे दिनांक ०९/०९/२०२० रोजी मयत झालेले आहेत.** अर्जदार क. १ हे मयताचे पती असून अर्जदार क. म लगा आहे. तसेच मयताची आई यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार १ ते २ मताने कायदेशीर वारस आहेत हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोति हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १७/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २२/११/२०२४ ही आहे.

आदेशावरून.

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

(स्वाक्षरीत)
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर. शिरूर का.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ पान ४

मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

पोखरा मधून भ्रष्टाचाराबाबत चौकशी अहवाल देण्यास प्रकल्प संचालक साळवे यांची टाळाटाळ

नेकनूर: येथील दीपांकुर ऍग्रो प्रोडूसर कंपनी अंतर्गत जिरेनियम प्रकल्प व अवजार बँक नानाजी देशमुख कृषी संजीवनी देशमुख अंतर्गत देण्यात आली होती परंतु त्याच्यामध्ये कंपनी संचालकांनी व अधिकाऱ्यांनी संगणमत करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार २३ /२ /२०२४ रोजी देण्यात आली होती त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते परंतु पाटोदा येतील चौकशी समिती नेमली असता तेथील अधिकाऱ्यांनी आम्हाला इतर कामे आहेत आम्ही चौकशी करू शकत नाही आशा आशयाचे पत्र प्रकल्प संचालकास देण्यात आले त्यानुसार संबंधित तक्रारदाराने १५ ऑगस्ट दिवशी आमरण उपोषण केले असता तालुका कृषी अधिकारी गंडे यांनी लेखी आश्वासन दिले की एक महिन्याच्या आत चौकशी करून ▶▶ उर्वरित पान २ वर

निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून आदेश निर्गमित

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.

सदरील आदेश प्रत्येकावर तामील करणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिस विभागाने जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, सदरील आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहतील, असेही निर्गमित आदेशांमध्ये नमूद आहे. वेगवेगळ्या आदेशात पुढील बाबी नमूद आहेत.

● शासकीय, निम-शासकीय परिसर

जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि विश्राम गृहांच्या आवारात कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाजाचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणुकीसंबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, किंवा कार्यालयीन आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इ.बाबी नियंत्रित करणे या कृती करण्यास निर्बंध घालण्यात आला आहे.

● सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण

निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपित करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व परवानगी संपल्यानंतर ते दूर नष्ट करून इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

● मतपत्रिका छपाई

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय म ालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना ▶▶ उर्वरित पान २ वर

महत्वाचे...

आज आष्टीत आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली मागासवर्गीय, भटक्या विमुक्तांचा संवाद मेळावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आज शुक्रवारी दि.१८रोजी आष्टी येथे मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्तांच्या (अनु. जाती - जमाती) समाज बांधवांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मतदारसंघातील बौध्द, मातंग, ढोर, चांभार, भिल्ल, पारधी, कैकाडी, गोसावी, जोशी, तिरमल, वडार, मसनजोगी व इतर अनु.जाती जमातीतील जाती भटके विमुक्त समाज बांधवांच्या अनेक समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी मतदारसंघातील मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील कार्यकर्ते व समाजबांधवांनी लक्ष्मी लॉन खडकत रोड आष्टी येथे सकाळी अकरा वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते अजयदादा धोंडे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य आरोग्य आयोग नाशिक अंतर्गत झालेल्या परीक्षेत किरण नरवडे चा प्रथम क्रमांक

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत माजलगाव ची कन्या किरण नरवडे हिने ७४.३५% घेऊन प्रथम क्रमांक पाट विल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान पीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत कोल्हापूर सांगली परिसरात जास्त चा निकाल लागला असला तरी माजलगाव चि कन्या किरण नरवडे हिने ७४.३५% मार्क घेऊन प्रथम क्रमांक पटकावला यामुळे बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्याचे मान उंचावली गेली असल्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे किरण नरवडे हिचे शिक्षक वृंद नरवडे घाराण्याशी नातं असलेल्या लोकांनी अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

ट्विंकलींग स्टार स्कूल च्या अथर्व शेळके व सिद्धी जायभाये यांची राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड

बीड । प्रतिनिधी

दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी संभाजीनगर सिद्धार्थ जलतरण तलाव येथे आयोजित विभागीय स्पर्धा पार पडल्या दरम्यान ट्विंकलिंग स्टार स्कूल च्या अथर्व शेळके याने एक मीटर स्प्रिंग बोर्ड तसेच तीन मीटर स्प्रिंग बोर्ड या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले नाव कोरले. पुढील राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा अम रावती येथे होणार आहे. तसेच याच शाळेतील सिद्धी जायभाय या विद्यार्थिनींने १६ ऑक्टोबर २०२४ रोजी छ-३ स्केटिंग रिंग सिडको छत्रपती संभाजीनगर येते आयोजित करण्यात आलेल्या विभागीय स्पर्धे त प्रथम क्रमांक चे स्थान पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले.निवडी बदल सर्व स्तरातुन कौतुक केल जात आहे.या यशाबद्दल स्कूल चे चेअरमन गणेश मैड, स्कूल संचालिका शीतल मैड, स्कूल डायरेक्टर कोमाथ भास्करन, प्राचार्या जयश्री कदम, उप प्राचार्य दीपक झा उप प्राचार्य कृष्णाकुमार, परिवेशिका मेरी अलेंझांडर, स्वाती राठोड, क्रीडा शिक्षक अशोक चौरे, दिनेश ढाकणे आदीनी सर्व विजय संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून कौतुक केले आणि पुढील होणाऱ्या स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

संस्कार विद्यालयात वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी श्रीमती कुलकर्णी ताई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या म नोगतात बालगोपालांना वाल्मिकी ऋषी बद्दल माहिती सांगितली . रामायणातील घटना , रामाचं व्यक्तिमत्व , आदी बद्दल मुलांना माहिती दिली. चिरंजीव सार्थक अश्विन पालसिंगणकर याने रामरक्षाचे पठण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती खवले यांनी केले. कार्यक्रमास माननीय मुख्याध्यापिका श्रीमती जाधव ताई , सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

जागतिक अंध दिनाचे औचित्य साधूनमराठवाड्यातील दीडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील बीअँड व्हीजन फाउंडेशन लातूरच्या वतीने राजस्थानी मंगल कार्यालयात मराठवाड्यातील दीडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण करण्यात आले .अंध व्यक्ती विषयी जनजागृती कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी मंगळवारी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर म ाधव गोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील मानवलोक संस्थेचे कार्यवाहक अनिकेत लोहिया आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरुषोत्तम चोपडा हे होते.

बीअँड व्हीजन फाउंडेशन ही संस्था सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीसाठी शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, साहित्य, मनोरंजन ,सांस्कृतिक व सामाजिक पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असणारी लातूर येथील सेवाभावी संस्था असून उद्देशपूर्तीसाठी राज्यभरात विविध कार्यक्रम राबवत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर माधव गोरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली. अनिकेत लोहिया यांनी याप्रसंगी मार्गदर्शन पर भाषण केल.

याप्रसंगी अंबाजोगाई येथील श्री सुहास पाठक आणि मित्र परिवारातर्फे मराठवाड्यातील अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण अनिकेत लोहिया आणि पुरुषोत्तम चोखडा ▶▶ उर्वरित पान २ वर

नांदेड लोकसभेसाठी काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी

नांदेड । प्रतिनिधी

खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या नांदेड लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसने रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विधानसभेबरोबरच येथे लोकसभेसाठीही २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत नांदेड मतदारसंघात काँग्रेसचे वसंतराव चव्हाण यांनी भाजपचे प्रताप पाटील चिखलीकर यांचा दारुण पराभव केला. मात्र निकालानंतर अवघ्या काही दिवसांतच त्यांची प्रकृती ढासळली आणि हैदराबादेत उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या नांदेड लोकसभेसाठी काँग्रेसने त्यांचे पुत्र रवींद्र यांना उमेदवारी जाहीर केली आहे. लोकसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

मराठा समाजाच्या आजच्या बैठकीत काय ठरलं ?

निवडणूक लढवण्याबद्दल 'जरांगे' यांनी दिली महत्वाची माहिती

जालना । प्रतिनिधी

राज्याची विधानसभा निवडणूक लढवण्याबाबत आज मराठा समाजाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणूक लढवण्याबद्दल महत्वाची माहिती जाहीर केली आहे. मनोज जरांगे म्हणाले आहेत की, आजच्या बैठकीत काहीही ठरलेले नाही. सगळ्यांशी फक्त चर्चा झाली. पुढे काय करायला पाहिजे याबाबत चर्चा झाली.

ते म्हणाले, शेती, आरक्षण, दलीत मुस्लिम, गोरगरीब ओबीसींच्या मुद्दयावर आजच्या बैठकीत चर्चा झाली. आज फक्त चर्चा झाली. अठरा पगड जाती, दलीत, मुस्लिम पासाठी काम करायचं आहे. ९५ टक्के सम ाजकारण आणि ५ टक्के राजकारण. उमेदवारबाबत चर्चा झाली. मात्र निवडणूक लढविण्यासाठी आलेल्या इच्छुक यांची मते जाणून घेतली.

'अंतिम निर्णय २० तारखेला

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, अंतिम निर्णय २० तारखेला होईल. तेथे समाज बांधव येतील त्यांच्या साक्षीने निर्णय घेतला जाईल. मी सर्वांची मत जाणून घेतली, समाजाचा एकूण घेणं माझं काम आहे. त्यामुळे कुणीही उद्या बोलू नये. मत मांडू दिलं नाही म्हणून. जो निर्णय २० तारखेला होईल तो समजाच्या हिताचा होईल. १८०० अर्ज आले होते, आज पुन्हा प्रचंड अर्ज इच्छुकांचे अर्ज आले आहेत.

जरांगे पुढे म्हणाले की, ही लाट आहे. ही लाट देवेंद्र फडणवीस यांची वाट लावेल. या मन:स्थितीत जायला फडणवीस यांनी भाग पाडलं. अनेक राज्यकर्ते होऊन गेले, त्यानी समाजाचं काम केलं. मात्र फडणवीस डागी माणूस आहे.

ते म्हणाले, जाता जाता ▶▶ उर्वरित पान २ वर

पालक आणि पाल्य यांना कायद्याचे ज्ञान असने ही काळाची गरज :ॲड संगीता धसे

बीड । प्रतिनिधी

सावरकर प्राथमिक विद्यालय बीड येथे पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर सीमा जोशी तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर, काळे मॅडम, जयश्री नेलवाडकर ताई, देशपांडे ताई आणि शालेय अध्यक्ष एस एम कुलकर्णी सर उपस्थित होते. यावेळी शाळेतील पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदिप जोशी सर यांनी केले , तसेच महिला आणि मुली यांच्यावर वाढत असलेला अत्याचार या अनुषंगने ड संगीता धसे यांनी पालकांनी विद्यार्थ्यांची काळजी कशी घ्यावी जेणेकरून कुठलाही अती प्रसंग लेकराच्या वाट्याला येण्यापूर्वी आपण पाल्यांची काळजी घेतली, त्यांना वेळ दिला, त्यांच्याशी संवाद साधून मैत्रीचे नाते ठेवले तर पाल्य पालकाशी मनमोकळे बोलू शकेल, तनावपूर्ण नात न राहता एक मैत्रीपूर्व नात राहीले ▶▶ उर्वरित पान २ वर

बीडमध्ये दोनच आमदारांची उमेदवारी फिक्स; महायुती आणि महाविकास आघाडीत 'राष्ट्रवादीच' वरचढ

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जागा वाटपात महायुती आणि महाविकास आघाडींमध्ये दोन्ही 'राष्ट्रवादीच' म ोठा भाऊ ठरणार आहेत. महायुतीत शिवसेनेलाही राष्ट्रवादी अजित पवार गटाने ऑक्सिजनवर ठेवले आहे. तर, महाविकास आघाडीम ध्येही काँग्रेस आणि शिवसेनेच्या (यूबीटी) हाती काही लागेल असे चित्र नाही. दरम्यान, सहा आमदारांपैकी केवळ दोघांच्या उमेदवारीवर आजघडीला तरी मोहर आहे. उर्वरित चार आमदारांच्या उमेदवारींचा फैसला बदलत्या राजकीय समीकरणांनुसार होणार आहे.

महायुतीमधून पालकमंत्री धनंजय मुंडे यांना परळीची उमेदवारी निश्चित मानली जाते. केजमध्येही भाजपच्या नमिता मुंदडा यांचे तिकीट फिक्स आहे. भाजपचे गेवराईचे आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणुक लढविणार नसल्याची घोषणा केली असली तरी ते लढणारच नाहीत असेही सांगता येत नाही. त्यांच्या घरातून भावजय गीता पवार किंवा पुतणे शिवराज पवार यांचीही चर्चा आहे. मात्र, पवारांनी भाजप सोडल्यात जमा आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनीही लढणार नसल्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र, त्यांच्या वारसाला उमेदवारी मिळेल का, असाही प्रश्न आहे. आष्टीत राष्ट्रवादीचे बाळासाहेब आजबे आमदार असले तरी या ठिकाणी भाजपच्या सुरेश धसांसाठी जागा सोडण्याबाबत खलबते सुरु आहेत. बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर यांना स्वकियांनीच घेरले आहे.

■ मनोज जरांगेच्या भूमिकेकडे लक्ष

महायुतीत शिवसेनेच्या बीडच्या एकमेव जागेवर अतिक्रम णाची तयारी राष्ट्रवादीकडून सुरु आहे. आज (गुरुवारी) अंतरवाली सराटीत मनोज जररांगे पाटील यांनी बोलवितेती इच्छुकांची बैठक आणि २० तारखेला समाजाच्या सभेत ते काय घोषणा करतात, यावरही समीकरणे अवलंबून आहेत. धनंजय मुंडे यांच्या विरोधात परळीत 'लोहे को लोहा' असे सुत्र अवलंबिण्यासाठीच बबन गित्ते, सुनिल गुट्टे, राजाभाऊ फड, फुलचंद कराड, सुदामती गुट्टे यांच्या यादीत आता माजी आम दार संजय दौंड यांचेही नाव पुढे येत आहे. या चौघांसह काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, माधव जाधव यांची एकत्रित मोट बांधण्याचे शरद पवारांचे प्रयत्न आहेत.

■ माजलगाव, केजमध्ये कोण ?

माजलगावमधून प्रकाश सोळंके यांनी लढणार नसल्याची घोषणा केली आहे. तर, पाच दिवसांपासून भाजपच्या रमेश आडसकरांच्या सोशल मीडियावरही 'घेऊ भरारी'चा नारा आहे. त्यांची 'तुतारी' निश्चित म ानली जात आहे. जयसिंग सोळंके, अशोक डक, माधव निर्मळ, बाबरी मुंडे हे महायुतीकडून तर माजी आमदार राधाकृष्ण होके, नारायण डक, मोहन जगतापही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुकांच्या यादीत आहेत.

केजमधून भाजपच्या नमिता म ुंदडा यांच्या विरोधात लढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुकांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. खासदार बजरंग ▶▶ उर्वरित पान २ वर